# बायोमिक्स : एक उपयुक्त जैविक मिश्रण




- बायोमिक्स हे एक उपयुक्त जैविकांचे मिश्रण असून ते निरनिराळ्या उपयुक्त बुरशी आणि जीवाणूंपासून वनस्पती रोगशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी द्वारा तयार केलेले आहे. यामध्ये चौदा विविध पिक आणि जमिनीस उपयुक्त सूक्ष्मजीव असून त्यांचे कार्य वेगवेगळे आहे.
- हे एकच जैविक मिश्रण किड व रोग नियंत्रणासाठी तसेच पिकास अन्नद्रव्याची उपलब्धता होण्यासाठी आणि एकूण उत्पादन व उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी फायदेशीर आहे.
- हे मिश्रण वनस्पती रोगशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, परभणी व विद्यापीठाच्या काही संशोधन केंद्रांवर भुकटी व विद्राव्य स्वरुपात उपलब्ध आहे.
- या जैविक मिश्रणाच्या वापराने शेतकऱ्यांना अनेक पिकांच्या जमिनीतून उद्भवणाऱ्या रोगांवर तसेच अनेक प्रकारच्या किडींवर नियंत्रण मिळवता आले आहे. या जैविकाच्या वापराने रोगनियंत्रणासोबत किडनियंत्रण, अन्नद्रव्याची उपलब्धता इ. फायदे होऊन पिकांचे उत्पादन वाढत आहे. तसेच रोग व किडींच्या नियंत्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशक, बुरशीनाशक इ. वर होणाऱ्या खर्चात बचत होत आहे.
- **बायोमिक्स मधील जैविक घटक**

| अ.क्र. | घटक | अ.क्र. | घटक |
|---|---|---|---|
| १ | ट्रायकोडर्मा अस्पेरेलम | ८ | व्हर्टीसीलीयम लेकानी |
| २ | ट्रायकोडर्मा हर्जीयानम | ९ | सुडोमोनास फ्लुरोसन्स |
| ३ | अस्परजिलस अवामोरी | १० | सुडोमोनास *स्ट्रायटा* |
| ४ | मेटॅरिझियम ॲनिसोप्ली | ११ | ग्लुकोनासेटोबॅक्टर |
| ५ | न्यूमोरिया रेलयी | १२ | बॅसिलस सबटिलिस |
| ६ | पॅसिलोमायसीस लीलॅसिनस | १३ | पी.पी.एफ.एम |
| ७ | बेव्हरिया बासियाना | १४ | अझोस्पिरीलम ब्राझीलन्स |


- **बायोमिक्स वापरायचे फायदे**
- प्रतिरोध, पुनरुत्थान आणि अवशेष समस्या तयार करत नाही.
- रोगकारक बुरशींमध्ये प्रतिकारकशक्ती निर्माण होण्याची शक्यता कमी आहे.
- नैसर्गिक घटक असल्याने, मानव, पशु तसेच पर्यावरणावर विपरीत होत परिणाम नाही.
- रासायनिक कृषी पेस्टीसाइडच्या तुलनेत बायो पेस्टीसाइडवर खर्च कमी होतो.
- वनस्पतींमध्ये उपस्थित असलेले रोगप्रतिकार जीन्स सक्रिय करून रोगकारकांच्या विरोधात लढण्यासाठी तो वनस्पतींच्या आंतरिक क्षमतेचा देखील विकास करतो.
- पिकाच्या संपूर्ण वाढीच्या अवस्थेपर्यंत रोगांपासून संरक्षण करते.

**वापरण्याचे प्रमाण:**

- आळवणीसाठी २०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.
- फवारणीसाठी १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी

**एकरी प्रमाण** :

- आळवणीसाठी ४ किलो किंवा ४ लिटर
- फवारणीसाठी १ किलो किंवा १ लिटर







**संपर्क: बायोमिक्स संशोधन व निर्मिती केंद्र, वनस्पती रोग शास्त्र विभाग, व.ना.म.कृ.वि., परभणी**

**मोबाईल क्र. ९९२३६९७४३०**

# माऊमिक्स

**माऊमिक्स:**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी निर्मित माऊमिक्स हे मेटाराझीयम व बेव्हेरिया या जैविक बुरशींचे मिश्रण आहे.

**माऊमिक्स चे फायदे:-**

पिकातील निरनिराळ्या मऊ कातडींच्या किडींवर किंवा अळ्यांवर परोपजीवी पद्धतीने वाढ होऊन तिचे नियंत्रण करते. उदा. हुमणी, हिरवी बोंडअळी, शेंदरी बोंडअळी, पांढरी माशी, वाळवी इ. वर उपयुक्त. माऊमिक्सचा वापर केल्यानंतर अळी हिरवट काळी पडून मरते.

**वापरण्याचे प्रमाण:**


- आळवणीसाठी २०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.
- फवारणीसाठी १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी

**एकरी प्रमाण** :


- आळवणीसाठी ४ किलो किंवा ४ लिटर
- फवारणीसाठी १ किलो किंवा १ लिटर

**बायोमिक्स सोबत आळवणीसाठी एकरी प्रमाण:**

- २ किलो किंवा २ लिटर बायोमिक्स व २ किलो किंवा २ लिटर माऊमिक्स दोन्ही एकत्र २०० लिटर पाण्यात मिसळून एका एकर साठी आळवणी करावी. पंपाद्वारे आळवणी करावयाची असल्यास १० लिटर पाण्यामध्ये १०० ग्राम माऊमिक्स व १०० ग्राम बायोमिक्स एकत्र करून आळवणी करावी.



# माऊफंग




माऊफंग हे निरनिराळ्या ट्रायकोडर्माच्या प्रजातीचे मिश्रण आहे. हे मिश्रण सर्व पिकासाठी उपयुक्त असून जमिनीमधून होणाऱ्या अनेक प्रकारच्या रोगांच्या किंवा पिकांच्या रोगांच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहे.

माऊफंगचे फायदे: जमिनीतून व बियाण्याद्वारे प्रसारित होणाऱ्या निरनिराळ्या रोगकारक बुरशी व सूत्रकृमींवर परोपजीवी पद्धतीने वाढवून त्यांचे नियंत्रण करते. उदा. रायझोक्टोनिया, पिथिअम, व्हर्टिसीलियम इत्यादी सारख्या बुरशीवर वाढवून त्याद्वारे पिकातील रोगांचे नियंत्रण करते. पिकास झिंक व इतर सूक्ष्म मूलद्रव्य मिळवण्यासाठी मदत करते. पिकात अजैविक व जैविक ताण सहन करण्याची क्षमता निर्माण करते. पिकांमध्ये अँटीऑक्सिडंट क्रियाकल्प वाढवते.

**वापरण्याचे प्रमाण:**

**बीजप्रक्रिया:** बीजप्रक्रिया करिता १०० ग्रॅम किंवा १०० मिली माऊफंग प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात लावावे.

**कंदप्रक्रिया:** २०० ग्राम किंवा २०० मिली माऊफंग १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण करावे व लागवडीसाठी निवडलेले कंद या द्रावणात ३० ते ६० मिनिटे बुडवून ठेवावे.

**फवारणी:** १०० ग्राम किंवा १०० मिली माऊफंग १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण करावे व फवारणीसाठी वापरावे.

**आळवणी:** पंपाद्वारे आळवणी करावयाची असल्यास १० लिटर पाण्यामध्ये २०० ग्राम किंवा २०० मिली माऊफंग मिसळून जमिनीमध्ये पिकांच्या बुडास आळवणी करावी.

**मातीमध्ये मिसळणे:** माऊफंग भुकटी ५ किलो प्रति २५० किलो कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून प्रति एकर शेतामध्ये पेरणीपूर्वी मशागतीच्या वेळी टाकावे.

**माऊफंग वापरतांना घ्यावयाची काळजी:**

- माऊफंगचा वापर कोरड्या जमिनीत करू नये.
- बीजप्रक्रिया केलेले बियाणे / बेणे सूर्यप्रकाशात ठेवू नये.
- माऊफंगचा वापरण्यापूर्वी किंवा वापरल्यानंतर ४ ते ५ दिवस रासायनिक औषधांचा वापर करू नये.

**संपर्क: बायोमिक्स संशोधन व निर्मिती केंद्र, वनस्पती रोग शास्त्र विभाग, व.ना.म.कृ.वि., परभणी**
**मोबाईल क्र. ९९२३६९७४३०**